## मोटार अपघात दावा अर्ज क्र. ५०/२०२० मधील नि.६ खालील आदेश

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.३०.०८.२०१९ रोजी रात्री ८ वाजताचे सुमारास अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र. २ व ३ चे पिता आणि अर्जदार क्र. ४ यांचे जावई मयत बापूराव रामचंद्र बनकर हे फलटण–पंढरपुर रस्त्याने सायकलवरुन जात असताना निंबळकनाका येथे आले असता सामनेवाला यांच्या मालकीची एस्.टी. बस क्र. एम.एच.४० एन.९४०१ ही तिचे चालक सामनेवाला क्र. १ यांनी निष्काळजीपणे, भरधाव चालवून, बापूराव रामचंद्र बनकर चालवित असलेल्या सायकलला धडक दिली. त्या अपघातामध्ये बापूराव रामचंद्र बनकर हे गंभीररित्या जखमी होवून मयत झाले. अपघाताचे वेळी सदर बस सामनेवाला क्र. २ एस.टी. महामंडळ यांच्या मालकीची होती. अर्जदारांनी येणेप्रमाणे झालेल्या अपघाताबाबत सामनेवालांकडून नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

३. सामनेवाला क्र.२ यांनी अनुक्रमे निशाणी १६ प्रमाणे म्हणणे दिले आहे. सामनेवाला क्र.१ यांनी निशाणी १७ प्रमाणे पुरशीस दाखल करुन सामनेवाला क्र. २ यांनी दिलेले म्हणणे स्वीकारले आहे.

४. अर्जदारांनी यादी नि.४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे फलटण ग्रामिण पोलीस ठाणे मधील दि.३०.०८.२०१९ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.४२२/२०१९ मधील प्रथम वर्दि अहवाल आणि घटनास्थळ पंचनाम्यावरुन अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. सदर अपघाताबाबत पोलीसांनी वर नमुद एस.टी. चालकाचे विरुध्द गुन्ह्याची नोंद केलेली आहे.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या शव विच्छेदन अहवालावरुन असे स्पष्ट होते

की, बापूराव रामचंद्र बनकर यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला क्र .२ हे सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.२ यांनी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदारांना द्यावेत. त्यापैकी अर्जदार क्र.१ यांना रु.२०,०००/– (रु.वीस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी रु.१०,०००/– (रु.दहा हजार फक्त) रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावेत. अर्जदार क्र.२ व ३ अज्ञान असल्याने त्यांच्या हिश्याची रक्कम अज्ञान पालन कर्ता म्हणून त्यांची आई अर्जदार क्र.१ अनिता बापूराव बनकर यांना रेखांकित धनादेशाद्वारे देणेत यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.२ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा.
दिनांकः ०७.१०.२०२१

( मंगला ज. धोटे )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.